**ठळक बातम्या**

- डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज देशभरात त्यांना अभिवादन, राज्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन

- रेपो दर साडे सहा टक्क्यावर कायम ठेवण्याचा रिझर्व्ह बँकेचा निर्णय

- संसदेच्या दोन्ही सभागृहांत विरोधकांच्या गदारोळामुळे कामकाज दिवसभरासाठी तहकूब

**आणि**

- बॉर्डर-गावस्कर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात भारतीय फलंदाजांची हाराकिरी

**<><><><><>**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज देशभरात त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भूवनेश्वर इथं डॉ आंबेडकर यांना आदरांजली वाहिली. उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी संसद भवन परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहिली. प्रधानमंत्री मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात देखील डॉ. आंबेडकर

यांना अभिवादन केलं आहे. समता आणि माणसांच्या सन्मानासाठी आंबेडकरांनी दिलेला अथक लढा अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील, त्यांचं स्वप्न पूर्ण करण्याच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार करत आहोत, असं प्रधानमंत्री आपल्या संदेशात म्हणाले.

महापरिनिर्वाण दिनानिमित्त बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी मुंबईत दादरच्या चैत्यभूमीवर राज्यभरातून मोठ्या संख्येनं अनुयायी दाखल झाले आहेत. महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चैत्यभूमी इथं बाबासाहेबांना अभिवादन केलं. यानंतर आयोजित कार्यक्रमात राज्यपालांनी, भारताची लोकशाही बळकट करण्याचं काम राज्यघटनेनं केलं असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानामुळे आपला देश उत्तरोत्तर प्रगती करत असल्याचं नमूद केलं. देशाच्या कानाकोपऱ्यातून अस्पृश्यतेचं उच्चाटनं करणं हीच आंबेडकरांना आपण वाहिलेली खरी आदरांजली असेल, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. **नागपूर** इथल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती आणि समता सैनिक दल मुख्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूरच्या दीक्षाभूमीतल्या यात्री निवासात महारक्तदान शिबिराचं आयोजन करण्यात आलं होतं. या शिबिरात सहभागी होत नागरिकांनी रक्तदानाच्या माध्यमातून बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केलं.

**हिंगोली** जिल्ह्यात विविध ठिकाणी अभिवादन सभा तसंच कार्यक्रम सुरू आहेत. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी हिंगोलीतल्या त्यांच्या पुतळ्याच्या परिसरात अनुयायी मोठ्या संख्येनं उपस्थित आहेत. **वाशिम** शहरातल्या विविध ठिकाणी बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी आज पहाटे कॅण्डल रॅली काढण्यात आल्या. विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी, कार्यकर्त्यांनी, सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींनी तसंच सामान्य नागरिकांनी आंबेडकर चौक परिसरातल्या बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**धाराशिव** इथं राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सामाजिक समरसता मंचाच्या वतीनं रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आलं होतं. या शिबिराची सुरुवात स्वच्छता कर्मचारी महिलेच्या हस्ते करण्यात आली.

**बुलडाणा** जिल्ह्यातल्या शहरी भागांसह ग्रामीण भागातही विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. बुलडाणा शहरातल्या डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याला अनुयायांनी पुष्पहार अर्पण केले. जिल्ह्याच्या ग्रामीण भागात विविध ठिकाणी रक्तदान शिबिरांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पत धोरण समितीनं रेपो दरात काहीही बदल न करता तो साडे सहा टक्के कायम राखण्याचा निर्णय घेतला आहे. समितीनं हा दर कायम राखण्याची ही ११वी वेळ आहे. यामुळे स्थायी ठेव सुविधा दर सव्वा सहा टक्के तर सीमांत स्थायी सुविधा दर आणि बँक दर

पावणे सात टक्के कायम राहणार आहे. रिजर्व्ह बँकेनं फेब्रुवारी २०२३ पासून रेपो दरात कोणताही बदल केलेला नाही.

<><><><><>

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा उद्या हरयाणातील पंचकुला इथं देशव्यापी क्षयरोग निर्मूलन मोहिमेची सुरुवात करतील. देशातल्या ३३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातल्या ३४७ जिल्ह्यांमधून राबवली जाणारी ही मोहीम १०० दिवस चालणार आहे. प्रधानमंत्री मोदी यांनी २०१८ मध्ये क्षयरोग निर्मूलन परिषदेत या उपक्रमाची प्रथम घोषणा केली होती. या १०० दिवसांच्या मोहिमेत अधिक प्रमाणात क्षयरोगी असलेल्या वस्तींशी संपर्क वाढवून नवीन रुग्ण शोधणे, गंभीर आजारी क्षयरोग्यांसाठी आधुनिक उपचार, तसंच पोषक आहाराच्या पुरवठ्यावर भर दिला जाईल.

<><><><><>

अदानी लाचखोरी प्रकरण आणि अन्य मुद्द्यांवरून विरोधकांनी लोकसभेत आज गदारोळ केल्यानं सभागृहाचं कामकाज प्रारंभी दुपारी १२ वाजेपर्यंत आणि त्यानंतर दिवसभरासाठी तहकूब केलं. सभागृहाचं कामकाज आता सोमवारी ९ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता सुरू होईल.

आज सकाळी लोकसभेच्या कामकाजाला सुरुवात झाली तेव्हा काँग्रेससह अन्य विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभागृहात गदारोळ करायला सुरुवात केली. त्यावेळी सभापती ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराचा तास सुरू करायला सांगितलं. परंतु विरोधी पक्षाच्या सदस्यांनी गदारोळ सुरूच ठेवल्यानं सभापतींनी कामकाज दिवसभरासाठी स्थगित केलं.

दरम्यान, अदानी उद्योग समूहावरील कथित लाचखोरी आरोपांविरोधात इंडिया आघाडीच्या खासदारांनी संसदेच्या परिसरात आज सकाळी निदर्शनं केली. या निदर्शनात काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल, झारखंड मुक्ती मोर्चा आणि डावे पक्ष सहभागी झाले होते. संसदेच्या संयुक्त समितीनं या प्रकरणाची चौकशी करावी अशी मागणी काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांनी केली.

**<><><><><>**

राज्यसभेचं कालचं कामकाज तहकूब झाल्यानंतर सभागृहाची नियमित तपासणी करताना एका आसनाखाली नोटांची बंडलं आढळून आली. आज सकाळी राज्यसभेचं कामकाज सुरू झाल्यानंतर अध्यक्ष जगदीप धनखड यांनी सभागृहातील २२२ क्रमांकाच्या आसनाखाली नोटांची बंडलं आढळून आल्याची माहिती सदस्यांना दिली. हे आसन काँग्रेसचे खासदार अभिषेक मनु सिंघवी यांचं असून याप्रकरणी तपास सुरू असल्याचंही धनखड यांनी सांगितलं.

अशा घटनांमुळे सभागृहाची प्रतिष्ठा कमी होत असल्याबद्दल सभागृहाचे नेते जगत प्रकाश नड्डा यांनी चिंता व्यक्त केली. या घटनेच्या चौकशीबद्दल कोणताही आक्षेप नसल्याचं विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितलं.

दरम्यान, या घटनेप्रकरणी खासदार अभिषेक सिंघवी यांनी खुलासा केला आहे. आपण सभागृहात जेव्हा जातो तेव्हा पाचशे रुपयाची एकच नोट जवळ बाळगतो, असं सिंघवी यांनी सांगितलं. आपण काल दुपारी १२ वाजून ५७ मिनिटांनी सभागृहात गेलो आणि त्यानंतर खासदार अयोध्या रामी

रेड्डी यांच्याबरोबर दीड वाजेपर्यंत कँटिनमध्ये होतो आणि त्यानंतर बाहेर पडल्याचं सिंघवी यांनी सांगितलं. दरम्यान, आजही राज्यसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं आहे.

**<><><><><>**

भारतीय जनता पक्षाचे आमदार कालिदास कोळंबकर यांनी आज राज्य विधानसभेचे हंगामी अध्यक्ष म्हणून शपथ घेतली. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राजभवनात त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानपरिषदेच्या उपाध्यक्ष डॉ नीलम गोऱ्हे तसंच इतर मान्यवर उपस्थित होते. उद्यापासून ९ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनात ते अध्यक्ष म्हणून काम पाहतील. या अधिवेशनात ते २८८ नवनिर्वाचित विधानसभा सदस्यांना पदाची शपथ देतील आणि ९ डिसेंबरला विधानसभा अध्यक्षांची निवडणूक घेतील. त्यानंतर राज्यपाल विधिमंडळाला संबोधित करतील.

**<><><><><>**

रायगड जिल्ह्यातल्या पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेला आज प्रारंभ झाला. या अभियानात १ वर्ष ते १९ वर्ष वयोगटातल्या मुलामुलींना जंतनाशक गोळ्या देण्यात येत असून हात स्वच्छ धुण्याचं प्रात्यक्षिकही देण्यात येत आहे. पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातल्या १ लाख ५० हजार मुलांना याचा लाभ मिळणार आहे. जंत दोषामुळे बालकांमध्ये ॲनिमियाचा सर्वाधिक धोका उद्भवतो शिवाय

आतड्यांना सूज येणे, पोटदुखी, भूक मंदावणे, उलट्या, अतिसार तसंच इतर आजार उद्भवतात. या आजारांना आळा घालण्यासाठी वर्षातून दोन वेळा बालकांनी जंतनाशक गोळी घेणं गरजेचे आहे.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया संघात बॉर्डर-गावसकर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेलता दुसरा सामना आज सुरू झाला. ॲडलेड इथल्या ओव्हल मैदानावर सकाळी साडे नऊ वाजता सुरू झालेला हा सामना गुलाबी चेंडूच्या वापरासह दिवस-रात्र खेळवला जात आहे. भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, ऑस्ट्रेलियन गोलंदाजी पुढे भारतीय फलंदाजी गडगडली. सलामीला उतरलेला यशस्वी जयस्वाल शून्यावर बाद झाला. त्यानंतर रोहित शर्मा अवघ्या तीन धावांवर तर विराट कोहली सात धावांवर बाद झाला. नितीश रेड्डी, के. एल राहुल, आणि शुभमन गिल यांच्याखेरीज बाकीचे फलंदाज फारशी कामगिरी करू शकले नाहीत. त्यामुळे भारतीय संघ अवघी १८० इतकीच धावसंख्या उभारू शकला. ऑस्ट्रेलियाच्या मिशेल स्टार्क याने ६ बळी घेतले.

मध्यंतरानंतर ऑस्ट्रेलियाचा संघ फलंदाजीला उतरला असून शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या नाबाद २१ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**